# चिती व शिक्षक शिक्षण

**डॉ. वसुधा वि. देव,**

**शासकीय अध्यापक महाविद्यालय,**

**अकोला.**

NCF २००५ मधील खालील काही विधानाकडे मी आपले लक्ष वेधु इच्छीते.

" आज अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणामुळे ज्ञानाचे रूपांतर क्रयवस्तुत होत आहे. आणि सर्व मानवी व्यवहारांवर बाजारपेठेचे आक्रमण होत आहे त्यामुळे लोकामधील ज्ञान पंरपरा आणि कौशल्य यांना धोका निर्माण झाला आहे. या परिस्थीतीत मुलांमधील सर्जनशीलता नैतिकता आणि आत्मसन्मान यांची जोपासना व विकास करण्याचा कामाला जास्त महत्व द्यायला हवे"

"निसर्ग आणि समाजिक पर्यावरण ह्याच्यात मेळ साधत जगणे ही मुलभूत मानवी गरज आहे."

"आपला सांस्कृतिक वारसा आणि राष्ट्रीय अस्मीता जोपासण्यासाठी अभ्यासक्रमाने नव्या पिढीला बदलत्या सामाजिक परीस्थीतीत नवी दृष्टी नवी प्राधान्ये यांच्या संदर्भात भूतकाळाचे मूल्यमापन आणि परीशीलन करण्याची क्षमता निर्माण करायला हवी."

"अध्यापन हाच व्यवसाय म्हणुन स्विकारलेला प्रशिक्षीत व समर्पित शिक्षक वर्ग उपलब्ध असणे ही सर्वच क्षेत्रातील शैक्षणिक गुणवत्तेची पूर्ण अट आहे. कोणत्याही शिक्षणव्यवस्थेच्या गुणवत्तेचा स्तर व शिक्षकाच्या गुणवत्तेच्या स्तराहून वरचा असुच शकत नाही."

“शिक्षकाची व्यवसायिक तयारी करून घेणे अत्यंत महत्वाचे आहे हे जरी १९६० साली ओळखले गेले असले तरी आजही हया बाबतचे वास्तव चिंताजनक आहे.”

“चटोपाध्याय समीतीने (१९८३-१९८५) शिफारस केली होती की माध्यमिक शिक्षकासाठी प्रशिक्षण कालावधी हा १२ वी नंतर ५ वर्ष इतका असावा तसेच कला, विज्ञान महाविद्यालयात शिक्षण विभाग आणि अनिवार्यपणे असावा. म्हणजे विद्यार्थ्यांना शिक्षक प्रशिक्षणाची निवड करणे सुकर होईल.”

“मुलांच्या गरजांना आणि त्यांच्या शिकण्याला प्रतिसाद देणारे शिक्षक निर्माण करण्याची आवश्यकता आह”.

वरील सर्व वाक्यांचे अवलोकन केल्यास आपणास एक बाब निर्दशनास येते की आज माहिती तंत्रज्ञान युगात ही काही चिरंतन बाबीचे मूल्य जोपासण्यात येणे अनिवार्य मानण्यात आले आहे. आज आधुनिकतेचा नविन ज्ञानाचा जेवढा उहापोह आहे तेवढे आपल्या संस्कृतीचे महत्व अधिष्ठान नाकारून चालणार नाही. सास्कृतिक वारसा राष्ट्रीय अस्मीता हया बाबी शिक्षणाचा पाया ठरतात. मग ते शालेय शिक्षण असो वा माहाविद्यालयीन असो अथवा शिक्षकांचे असो आणि नेमक्या हयाच बाबी अभ्यासक्रमाच्या अराखडयात जरी नमूद करण्यात आल्या असल्या तरी प्रत्यक्ष अभ्यासक्रम रचनेमध्ये या बाबी मिसळुन गेल्या आहेत असे म्हणता येणार नाही. शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर आजपर्यंत क्षमता आणि मूल्यांचा विकास हा केवळ पाठयपुस्तकांचाच भाग बनला स्वांतत्रोत्तर भारतात शिक्षणाबाबत अनेकदा विचार झाला त्यात अनेक आदर्श बाबींना तात्विकदृष्टया स्विकृती दिल्या गेली. व्यक्ती विकासाच्या ध्येयाला यात अतिशय महत्वाचे स्थान देण्यात आले पण ही व्यक्ती विकासाची संकल्पना अतिशय वरवरची संकल्पना मांडण्यात आली. आज शिक्षणातुन मानवाचा विकास होतो आहे पण मानव्याचा विकास मात्र होतांना आपणास आढळत नाही तात्कालीक गरजा हया शिक्षणातून पूर्ण होत आहे. पण शाश्वत गरजा मात्र पूर्ण होतांना दिसत नाही. हया सर्व बांबीकरीता जबाबदार कोण? व्यक्ती? समाज?शासन? शिक्षण? राजकारण की समाजकारण? हा वादाचा विषय होईल पण एक मात्र खरेकी ज्वलंत राष्ट्रीय अस्मिता असणारी पिढी घडवण्यात मात्र आम्ही अपयशी ठरलो आहोत. राष्ट्र घडवायचे असेल तर राष्ट्र बाबत प्रेम असणारी पिढी

घडवावी लागते पण आज दुर्देवाने आमचा युवक परकीयांवर प्रेम करतो. परकीय तत्वज्ञान परकीय विचारधारेचे आज आमच्या युवापिढीवर झाले. राष्ट्रीयत्व हा आमचा आत्मा तोच आम्ही गमावुन बसलो आहोत सततच्या गुलामगीरीमुळे आम्हास वैचारीक गुलामगिरीची सवय झाली आहे. हयाचाच परिणाम म्हणुन की काय पण भारत पुन्हा गुलामगीरीत जातो आहे की काय? असा संभ्रम निर्माण होतो पण हया सर्व परिस्थितीतुन सावरण्याचे सामर्थ्य फक्त शिक्षणातच आहे. भारतीय संस्कृती प्राचीन आहे भारतीय अध्यात्म अजरामर आहे. राष्ट्र निर्मीतीचे कार्य जर शिक्षणातुन व्हायचे असेल तर त्या करता शिक्षणाला पुनश्च नविन पिढीवर योग्य संस्कार करावे लागतील. शाळा-शाळा मधुन मानव घडायला हवा.

आज भौतीक समृध्दीचे संस्कार होतात पण अध्यात्मिक समृध्दीचे संस्कार होतांना दिसत नाही. आधुनिकतेकडे वाटचाल करतांना प्राचीन ध्येय मूल्य अध्यात्म संस्कृती यांना आम्ही मागे टाकले आहे की काय? असा संभ्रम निर्माण होतो. भारताच्या विकासासाठी पाश्चात्यांसारखी शिक्षण प्रणाली आपणास उपयुक्त ठरणार नाही त्यासाठी त्याला भारतीयत्वाचाच आधर घ्यावा लागेल. राष्ट्र अध्यात्म मूल्य धर्म याचा पाया व स्वराज्य स्वातंत्र्य, स्वधर्म स्वभाव याची चौकट आपणास शिक्षणाला प्रदान करून द्यावी लागेल कोणात्याही देशाचा विकास हा मानवातील मानव्यावर अवलंबुन असतो आणि म्हणुनच शिक्षणातुन माणुस घडणे महत्वाचे आहे. हया सर्व बाबी प्रत्यक्षात आणण्या करता तसेच पुढील पिढीत संक्रमीत होण्यासाठी सर्वात महत्वाचा घटक म्हणजे शिक्षक होय. शिक्षक हा शिक्षण प्रणालीचा कणा आहे तसेच त्याची भुमिका ‘‘Integrated Human Builder” म्हणुन मांडण्यात आली आहे व त्याकरता प्रशिक्षणातुन Knowledge Skill व Attitude विकसीत व्हावे हयावर भर देण्यात येतो. हा कणा जेवढा मजबुत तेवढी शिक्षण प्रणाली मजबुत बनते. आजच्या शिक्षण प्रणालीत माहिती कोंबणारा घटक म्हणजे शिक्षक ही भुमिका शिक्षकाची बनली आहे पण ख-या अर्थाने Human Builder ही भुमिका शिक्षकाला यश्वस्वी पणे पार पाडायची असेल तर तो विद्यार्थ्यांच्या आदराला पात्र व्हायला हवा. तो केवळ ध्वनी मुद्रक नको Only teacher can supply a clear vision असे स्वामी चिन्मयानंद म्हणतात. हया दृष्टीकोणातून शिक्षक प्रशिक्षणाची रचना करतांना पं. दिनदयाल उपाध्याय यांनी नमुद केल्या नुसार सर्व प्रथम राष्ट्र संकल्पना हा शिक्षण

प्रशिक्षणाचा आत्मा, पाया, गाभा असावा व हया साठी राष्ट्र संकल्पनेस अनुसरून आपणास शिक्षक प्रशिक्षणाचा विचार करावा लागेल.

राष्ट्र संकल्पनेचे संस्करण करणारे शिक्षक प्रशिक्षण आपणास घ्यावे लागेल हयासाठी काही संदर्भ अतिशय महत्वाचे ठरतात. जे शिक्षक शिक्षणाच्या अभ्यासक्रामचे निदर्शक ठरतील.


१) **शिक्षक प्रशिक्षणाचा वैश्विक संदर्भ :-** या संपूर्ण विश्वाचा विचार केल्यास विश्वाचे अधिष्ठान सत्य, शिव व सुंदर हे तत्व आहे. अर्थात ही जीवनमूल्य अखिल जीवनाचे अधिष्ठान आहे. सत्य स्वरूपाचे ज्ञान म्हणजे ईश्वर निष्ठा, शिव स्वरूपाचे ज्ञान म्हणजे धर्मनिष्ठा व सुंदर स्वरूपाचे ज्ञान म्हणजे विज्ञान निष्ठा. विज्ञानाने जीवन सुंदर बनविले पण विज्ञानाचे आचारण धर्मानेच करावे लागते धर्माचे आचरण ईश्वरनिष्ठेने करावे लागते. इश्वर निष्ठा ही मानवाला स्वरूपाचे ज्ञान प्रदान करते. हा विश्वाचा आकृतीबंध आहे. हया आकृतीबंधामूळे विश्वाचे संतुलन राखल्या जाते. हया आकृतीबंधाचे संस्कार मानवीमनावर होण्याचे प्रभावी साधन शिक्षण आहे आणि म्हणुनच शिक्षणाच्या माध्यमातुन हा आकृतीबंध राबविण्यासाठी सर्व प्रथम याला शिक्षक प्रशिक्षणात आणणे हे शिक्षक प्रशिक्षणाचे महत्वाचे निदर्शक ठरते.

२) **शिक्षक प्रशिक्षणाचा राष्ट्रीय संदर्भ :-** सुसंस्कार करते ते शिक्षण माणसाला समर्थ बनविते ते शिक्षण आज शिक्षणातुन भारतीय विचारसरणीचा माणुस बनवायचा असेल तर सर्व प्रथम राष्ट्रीय भावनेने सुसंस्कारीत असा शिक्षक घडवावा लागेल. राष्ट्र म्हणजे केवळ एक भुभाग नव्हे तर समान परंपरा मूल्य अध्यात्म हयाने प्रेरीत झालेले व हया सर्वांच्या विकासाचे समान ध्येय असणारे व्यक्ती जेव्हा एका समान भुभागावर राहतात तेव्हा राष्ट्र बनते. राष्ट्रीय तत्वज्ञान हा देशाचा प्राण आहे राष्ट्राचा आत्मा आहे. पं. दिनदयाल उपाध्याय यांनी जी राष्ट्र संकल्पना मांडली त्यात त्यांनी चिती आणि विराट हया दोन संकल्पना मांडल्या. चिती म्हणजेच राष्ट्राचे स्वत्व, राष्ट्राचा आत्मा आणि अध्यात्म हे भारताचे स्वत्व आहे. भारताचे अंतरंग पहायचे असेल तर भारताचे अध्यात्म पुनरूज्जीवीत बनवावे लागेल. असे स्वामी विवेकानंदानी म्हटले आहे आणि म्हणुन अध्यात्म हा शिक्षणाचा मुलाधार ठेवावा लागेल. अध्यात्म हिच भारताची खरी राष्ट्रीय अस्मीता आहे. हया दृष्टीने शिक्षणाची दिशा ठरविणे हा शिक्षक शिक्षणाचा संदर्भ ठरतो.

३) **सामाजीक संदर्भ :-** शिक्षण हे 'विराट' हया संकल्पनेशी निगडीत असावे. अर्थात समाजाचा पुरूषार्थ जागविणारे शिक्षण आवश्यक आहे. प्रत्येक राष्ट्रीय समाजाच्या अंतरंगात एक विकासक्षम अंतर्भुत अशी आंतरीक उर्जा असते तीला एक निश्चीत दिशा असते ही आंतरीक उर्जा योग्य दिशेने गतीमान होणे म्हणजे राष्ट्रीय समाजाचा विराट जागवीणे होय. हया अर्थाने आत्मनो मोक्षार्थ जगत् हितायच, हे व्यक्तीचे जीवन साफल्य आहे. कृण्वन्तो विश्वमार्यम हा समाजिक संकल्प आहे. तर सर्वेपि सुखिन: सन्तु ही विश्वकल्याणाची भावना हा शिक्षणाचा मुलाधार आहे.

मनवाला जसे व्यक्तीमत्व आहे तसेच समाजाला ही व्यक्तीमत्व आहे. समाजालाही पुरूषार्थ आहे. हा पुरूषार्थ राष्ट्रीय आकांक्षेशी मिळताजुळता असणे आवश्यक आहे. पुढील आकृतीवरून समाजाचे व्यक्तीमत्व व समाजाचा पुरूषार्थ हया संकल्पना स्पष्ट होतात.


आकृती




हया बाबींना शिक्षक प्रशिक्षणाचा आधार बनविता येईल का?.

४) **शिक्षक प्रशिक्षणाचा व्यक्तीगत संदर्भ :-** व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास म्हणजे शिक्षण ही शिक्षणाची सर्वसामान्य परिभाषा करण्यात येते. मानवाचे व्यक्तीमत्व हे चतुर्वीध आहे हे पुढील आकृती वरून लक्षात येते.


आकृती





**मानवाचे चतुविध व्यक्तीमत्व**

जसे मानवाचे व्यक्तीमत्व चतुर्वीध आहे तद्‌वतच त्याच्या सुखाच्या प्रेरणाही चतुर्वीध आहे ही बाब पुढील आकृती वरून लक्षात येते

# आकृती




तसेच मानवाच्या मनातील आत्मीय जाणीवेचा परीघ हा व्यापकते कडे जाणारा आहे पुर्णत्वाकडे जाणे पुर्णत्वात विलीन होणे ही मानवाची मुळ धडपड असते. या परीघाची कक्षा स्व पासुन वैश्वीकते कडे जात असते. बाब पुढील आकृती वरून लक्षात येते




हा शिक्षणाचा मुलाधार बनवीता येईल का? हा वास्तविक शिक्षणाचा व्यक्तीगत संदर्भ आहे.

**५) <u>गुणवत्तेचा संदर्भ :-</u>** प्रत्येकापर्यंत शिक्षण पोहोचावे हया साठी गुणवत्तेचा प्रश्न हा अतिशय महत्वाचा ठरतो कारण मुळातच गुणवत्ता पुर्ण शिक्षण मिळावे हे अपेक्षीत आहे. शिक्षक प्रशिक्षणाचा विचार केल्यास शिक्षक शिक्षणात समाविष्ट असणारे प्रत्येकच घटक गुणवत्तेचा संदर्भ ठरतात. निकष ठरतात. शिक्षक शिक्षणातुन असा शिक्षक घडवाचा आहे जो राष्ट्र हया कल्पनेने भरावलेला आहे आणि म्हणुनच शिक्षणाच्या प्रवाहात त्याने हया क्षमता संपादीत करणे आवश्यक आहे. ही क्षमता प्राप्त करण्यासाठी संपुर्ण राष्ट्र संकल्पनेचा परिचय त्याचे ज्ञान व हया ज्ञान व क्षमतेच्या माध्यमातुन पिढी घडविण्याचे सुसंस्कार करण्याचे कौशल्य संपादन करणे हा गुणवत्तेचा निकष ठरतो केवळ भौतिक संसाधने अथवा निकाल हा गुणवत्तेचा निकष ठरत नाही. समर्पित शिक्षक घडविण्यासाठी निर्धारीत ज्ञान व कौशल्य हे गुणवत्तेचे निकष ठरतात. व हे ज्ञान व कौशल्य विकसीत करण्यासाठी कोणते विषय, कोणते कार्य नेमून दिले हा गुणवत्तेचा निकष ठरतो. विविध

विषय निवडतांना राष्ट्रीय समाजिक अध्यात्मिक संदर्भ हे अभ्यासक्रमाचे Indicators ठरतात. व हयाला अनुसरून मगच पाठयपुस्तके, अभ्यासक्रम, अभ्यासपुरक उपक्रम, विविधकृतीचा सराव हयाचे नियोजन महत्वाचे ठरते. अभ्यासक्रम संकल्पनेशी भारतीय तात्वज्ञान, भारतीय मूल्यव्यवस्था, राष्ट्रसंकल्पना, सहअस्तीत्व सामाजिक पुरूषार्थ, इत्यादी संकल्पनाशी जोडावे लागतील जीवनाच्या सर्वांगीण गुणवत्तेशी शिक्षक प्रशिक्षणाची गुणवत्ता निगडीत आहे शिवाय गुवत्तेचा सदंर्भ केवळ व्यवस्थेशी जोडून चालणार नाही तर, मानवी, मन, बुध्दी, इ. मानवीय घटकाशी जोडावा लागेल. हयालाच अनुसरून विचार केल्यास मनातील संस्कारामुळे होणारी मानवी मनाची घडण, हा संदर्भ ठरतो शाश्वत विकासाच्या संकल्पनेशी शिक्षक शिक्षण जोडणे आवश्यक आहे. बुध्दीतील निर्णय क्षमता बौध्दीक विकास, मानसिक विकास अध्यात्मिक विकास व गुणवत्तेचा विकास महत्वाचा ठरतो.

शिक्षक प्रशिक्षणाच्या दृष्टीकोणातुन प्रशिक्षणाचे अधिष्ठान म्हणुन हे संदर्भ महत्वाचे ठरतात हया बाबीचा विचार केल्यास शिक्षक प्रशिक्षणाची ध्येये कोणती असावीत? अभ्यास विषय कोणते असावे हा अभ्यासक्रम किती वर्षाचा असावा? असे विविध प्रश्न उभे राहतात.

## शिक्षक प्रशिक्षणाची ध्येये :-

१) शिक्षक प्रशिक्षणाच्या माध्यमातुन शिक्षकामध्ये पुढील गुणांची रूजवणुक व्हायला हवी असे स्वामी चिन्मयानंदांनी नमुद केले आहे.

1) The practice of what is right & proper as indicate in scripture.
2) Living the ideal that have been intellectually comprehended during the status.
3) A spirit of self sacrifice.
4) Control of Sense.
5) Tranquility of mind.
6) Practice of concentration.
7) Doing ones duty towards humanity.

वरील गुणांची निर्मीती हि शिक्षक प्रशिक्षणाच्या माध्यमातुन होणे ही प्राथमिकता आहे. शिवाय शिक्षकाच्या खालील भूमिका त्याच्या महत्वाच्या ठरतात त्यादृष्टीने प्रशिक्षाणार्थीवर संस्कार व्हायला हवेत.

1) Worked as team
2) Serving as a preacher
3) Nourshing the character

शिक्षक हा ख-या अर्थाने Pure living चे उदा. बनायला हवा शिक्षक शिक्षणाचा विचार करतांना त्याच्या संदर्भाचा विचार करून प्रामुख्याने शिक्षक प्रशिक्षणातुन शिक्षकाचा पुढील दृष्टीकोन विकसित व्हायला हवा.

1) To give, To sure, To share ही knowledge शिक्षकाची खरी भूमिका आहे.
2) Real education means transformation of knowledge in to wisdom
3) ज्ञान व कृती याचा समन्वय हा महत्वाचा आहे
4) आजच्या पिढीला केवळ factual अथवा Wondrous Theory शिकवुन चालणार नाही तर जीवनाची आदर्श शिकवावी लागतील.
5) शिक्षण म्हणजे चारित्र्य बांधणी आहे.
6) खरा शिक्षक हा केवळ Instruction चा वापर करणार नाही तर तो ख-या अर्थाने philosopher guide बनायला हवा
7) भारतीय संस्कृती मूल्य तत्वज्ञान, हयाचे भान प्रशिक्षणातुन निर्माण व्हायला हवे
8) भारतीयत्वाचे भान राखणारा संस्कार होणारे प्रशिक्षण आवश्यक आहे.
9) शिक्षक शिक्षणातुन व्यक्तीमत्व विकासाचे संपुर्ण ज्ञान प्राप्त व्हायला हवे.
10) राष्ट्रीय दृष्टीकोन सांस्कृतीक दृष्टीकोन, धार्मिक दृष्टीकोन, संविधानाबाबत जाणीव हा प्रशिक्षणाचा गाभा असायला हवा.
11) व्यवसायाच्या प्रति समर्पणाच भावना निर्माण व्हायला हवी
12) शिक्षणातुन शिक्षक हा Creative, Innovative घडायला हवा


13) धर्म व विज्ञान हयाबाबत समन्वयात्मक दृष्टी निर्माण व्हायला हवी

14) धर्म अध्यात्म हयाबाबत अभ्यासकाची भूमिका विकसीत व्हायला हवी

15) आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे विज्ञानाचे आहे हे ही विसरून चालणार नाही आणि म्हणुनच शिक्षक शिक्षणातुन Knowledge Master व Wisdom Master हया दोन्ही भूमिका शिक्षकाच्या विकसीत व्हाव्यात.

16) सर्वात महत्वाचे म्हणजे शिक्षक प्रशिक्षणातुन अध्यापकीय व्यक्तीमत्वाचा विकास व्हायला हवा. उपरोक्त संदर्भ व दृष्टीकोनाचा विचार करता शिक्षक प्रशिक्षणाची ध्येय ही पुढील प्रमाणे असावीत.

१) शिक्षक शिक्षणाचे ध्येय अध्यापकीय व्यक्तीमत्वाचा विकास हे मुलभुत स्वरूपाचे ध्येय आहे किंवा दृष्टी vision आहे असेही म्हणता येईल हया अंतर्गत पुढील घटकांचा विचार आपणास करता येईल.



**१) निष्ठा निर्माण करणे :-** शिक्षक शिक्षणातुन निष्ठावान शिक्षक घडायला हवा हया निष्ठा पुढील घटकांच्या बाबतीत निर्माण व्हायला हव्यात.

| | |
|---|---|
| १. ज्ञाननिष्ठा | २. धर्मनिष्ठा |
| ३. अध्यात्मनिष्ठा | ४. राष्ट्रनिष्ठा |
| ५. समाजनिष्ठा | ६. विद्यार्थीनिष्ठा |
| ७. निसर्गनिष्ठा | ८. चारित्र्यनिष्ठा |
| ९. मूल्यनिष्ठा | १०. शांतीनिष्ठा |

**२) दृष्टीकोन विकसन - सकंल्पना विकसन**

१. मानवाचे चतुर्विध व्यक्तीमत्व

२. मानव व विश्व हयाचा सहसबध

३. व्यक्ती व समाज हयाचा सहसबध

४. ऐहिकता अध्यात्मिता सामाजीकता हयातील संतुलन

५. राष्ट्राचे व्यक्तीमत्व

६. राष्ट्रभक्ती

७. राष्ट्रीय एकात्मता

८. निर्णय क्षमता

९. चारित्र्य संपन्नता

१०. वैश्विक दृष्टीकोन

**दृष्टीकोन :-** शिक्षक शिक्षणातुन पुढील दृष्टीकोन विकसीत व्हायला हवे

**राष्ट्रभक्ती व राष्ट्रीय एकात्मता :-**

राष्ट्र म्हणजे केवळ भुखंडावर वास्तव्य करणारे देशाचे लोक नाही तर समान उच्च ध्येया साठी कार्य करणारे व्यक्ती जेव्हा एका विशिष्ट भौगोलीक क्षेत्राात एकत्र येतात तेव्हा ते राष्ट्र होते. हा संस्कार शिक्षणाचा गाभा आहे. हया ध्येया मध्ये निष्ठा

असते, कार्य प्रेरणा असते, संकल्प शक्ती असते, प्रेरणादायी वातावरणाची निर्मीती असते व हया सर्वाशी प्रामाणीक राहणारी मानवाची बुध्दी असते. शिक्षक हा राष्ट्रभक्त हवा.

**शिस्तप्रीयता :–**

शिक्षकाच्या अंगी स्वयंशिस्त, आत्मशिस्त महत्वाची आहे. बाहयशिस्त ही आंतरीक शिस्तीत परिवर्तीत व्हायला हवी ही शिस्त म्हणजेच ध्येयाच्या प्रती भक्ती समर्पण कर्मयोगाचे आचरण समाजसेवा, हृदयशुध्दी, संस्कृतीविकास, आत्मशिक्षण हे खरे अनुशासन आहे. हे अनुशासन शिक्षकाला संघटीत व्यक्तीमत्व प्रदान करू शकते शिस्त ही जसी शारीरीक तसीच ती बौध्दीक व मानसिकही असावी हया साठी सदाचाराचा अभ्यास महत्वाचा ठरतो.

**चारित्र्य संपन्नता :–**

चरित्र्याची अगदी थोडक्यात परिभाषा द्यायची असेत तर चांगल्या सवयी लागणे म्हणजेच चारित्र्याची बांधणी होणे चांगल्या सवयी हया चांगल्या कृतीच्या वारंवारीतेवर अवलंबुन असतात चांगल्या कृती हया चांगल्या विचारावर अवलंबुन असतात. शिक्षक शिक्षणातुन हया चांगल्या विचारांची बांधणी महत्वाची ठरते.

**नेतृत्व क्षमता :–** शिक्षक हा समाजाचा नेतृत्व करीत असतो देशाचा परिचय हा त्या देशाचा शिक्षक यावरून ठरते असे म्हटल्यास वावगे होणार नाही. समाज घडवतांना समाज हा शिक्षकाचे अनुकरण करतो विद्यार्थी आपल्या जीवनाचे मोजमाप हे आपल्या शिक्षकाच्या जीवनमूल्याच्या दर्जा पाहुन ठरवित असतात. शिक्षकाला vision असणे आवश्यक आहे. समाजाच्या पुनरूज्जीवना साठी समाजाच्या नेतृत्वात देवत्व येणे आवश्यक असते व हयासाठी समतोल दृष्टी विकसित व्हावी लागते ही बाब शिक्षक शिक्षणातुन प्रतीबींबीत व्हायला हवी.

**नाविन्याप्रती सकारात्मकता :–** शिक्षक शिक्षणातुन जसा Wisdom Master घडणे आवश्यक आहे. तद्वतच Knowledge Master होणे ही आवश्यक आहे व हयासाठी

आधुनीक तंत्रज्ञान विज्ञान यांच्याप्रती सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होणे आवश्यक आहे. आधुनिक म्हणवले जाणारे तंत्रज्ञान हयाचे उत्पती स्थान आपला देश आहे. याबाबतची स्विकृती त्याचा अभ्यास व त्याचा शिक्षणातील विवेकी वापर हयाबाबत त्याचा दृष्टीकोन सकारात्मक विकसित करावा लागेल.

### ३) कौशल्याचे विकसन करणे

१) **अध्यापन कौशल्य :-** प्राचिन अध्यापनाच्या पध्दती व आधुनीक अध्यापनाच्या पध्दती हयांच्यात मेळ निर्माण करणे व प्रत्येक पध्दतीवर प्रभुत्व निर्माण करणे हयासाठी शिक्षक शिक्षणात विविध कृतीसत्रांचा अवलंब आपणास करता येईल.

२) **आत्मप्रभुत्व :-** शिक्षकामध्ये हे कौशल्य निर्माण होणे अतिशय आवश्यक आहे कारण आज प्रत्येक क्षेत्रात जीवघेणी स्पर्धा सुरू आहे. प्रत्येक जण प्रत्येक क्षेत्रात आपण इतरांवर प्रभुत्व कसे संपादन करू यासाठी धडपडतो आहे पण व्यक्ती जोवर स्वत:वर प्रभुत्व प्राप्त करीत नाही तोवर तो जगावर प्रभुत्व प्राप्त करू शकत नाही. आत्म प्रभुत्व संपादन करण्यासाठी ज्ञान व उच्च जीवन मूल्य हयावर आरूढ व्हावे लागते यासर्व बाबी स्वत: शिक्षकामध्ये असल्या तर तो आपल्या विद्यार्थ्यामध्ये हे परिवर्तन आणु शकतो.

३) **सृजनशिलता :-** शिक्षक प्रशिक्षणातुन शिक्षकाची सृजनशिलता विकसीत व्हायला हवी. आज जागतीक स्तरावर सृजनशिलतेबाबत उहापोह होत आहे teaching for creativity ही संकल्पना आज तज्ञानी मान्य केली आहे. सृजनशिलता निर्मितीची जी साधने आहेत ती म्हणजे बुध्दी, ज्ञान आणि व्यक्तीमत्व व परिसर हया सर्व बाबीचे यथायोग्य ज्ञान शिक्षकास असले तर तो विद्यार्थ्यामध्ये ही सृजनशिलता निर्माण करू शकतो आणि हया साठी आपणास विशिष्ट अध्यापन पध्दतीचे सखोल ज्ञान शिक्षकांना द्यावे लागते त्यात प्रामुख्याने problem oriented, case studies, simulation, Roll play, Action research.

शिक्षक शिक्षणातुन वरील ध्येय साधणे आवश्यक आहे पण त्याकरीता काही विषयाचे नव्याने नियोजन आपणास करावे लागेल. हे विषय ठरवितांना विविध उपाय लक्षात घेउन मगच त्याचे निर्धारण करावे लागेल. पं. दिनदयाल उपाध्याय यांच्या विचार सरणीतुन जे आकृतीबोध प्रामुख्याने अभिव्यक्त होतात त्याला अनुसरून आपण विषयाची योजना करू शकु.

**शिक्षक शिक्षण आणि अभ्यासक्रम –** शिक्षक शिक्षणाचा अभ्यासक्रम तात्वीक व प्रात्याक्षिक दोन्ही स्तरावर असावा त्याचे थोडक्यात प्रारूप पढील प्रमाणे आहे.

**१) विकासाच्या आकृतीबंधास अनुसरून पढील विषय सुचविण्यात येत आहे.**

१. मानवी व्यक्तीमत्वाचे तात्वीक अधिष्ठान व शिक्षण
२. शातीचे शिक्षण
३. मनव्यवस्थापन
४. शाश्वत विकासाचे शिक्षण
५. भारतीय मानसशात्र
६. मूल्यशिक्षण
७. ध्यानशात्र
८. आत्मसंयमाचे शिक्षण
९. कला हस्तकला
१०. बालकाचे मानसशात्र तत्व व व्यवहार

**२) सहसंबंधाचा आकृतीबंध :–** विकासाच्या आकृतीबंधास अनुसरून आपणास पुढील विषय सुचविता येइल.

१. मानवाचे अध्यात्मिक अधिष्ठान
२. समाजाचे अध्यात्मिक अधिष्ठान (ैचपजपनेैवबपवसवहल) आणि शिक्षण
३. पर्यावरण शिक्षण
४. निसर्गाचे अध्यात्मिक अधिष्ठान

५. सहअस्तित्वाचे शिक्षण

६. अस्तित्वाच्या नियमाचे शिक्षण (धर्म आणि शिक्षण)

७. भारतीय सस्कती व शिक्षण

**३) राष्ट्रीय शिक्षणाचा आकृतीबंध :-** पामुख्याने राष्ट्रप्रेमाचे संस्कृतीप्रेमाचे शिक्षण महत्वाचे आहे हया करीता पुढील विषयाचे निर्धारण करता येईल.

१. उत्तरदायीत्वाचे शिक्षण (म्कनबंजपवद वित ।बबवनजंइपसपजल)

२. म्कनबंजपवद वित बपजप्रमदेीपच

३. भारतीय शिक्षणाचा इतिहास

४. संत साहीत्य व शिक्षण

५. थोर शिक्षकतज्ञ

६. भारतीय तत्वज्ञान व शिक्षण

**४) धार्मीक शिक्षणाचा आकृतीबंध :-** हयासाठी खालील विषयांचा अंतर्भाव करता येईल.

१. सहअस्तीत्वाचे शिक्षण

२. विविध धर्म शिक्षण

३. Spiritual Education & Practice

४. Meditation, Yoga, Japayoga.

५) नवीन युगाशी संहसंबध असावा यासाठी शै तंत्रज्ञानासारखा विषय आपणास अंतर्भुत करता येईल. शिक्षणाच्या व्यावस्थापनाचा इतिहास व नविन विचार प्रवाह हया सारखे विषय नविन ज्ञानाशी संबंध जोडण्याकरीता आपणास अंतर्भुत करता येईल नविन अभ्यासक्रम तत्वे व व्यवहार इत्यादी विषयाचा अंतर्भाव करता येईल.

**प्रात्याक्षिक कार्यातर्गत :-** आज प्रात्याक्षिक कार्यातर्गत विविध अध्यापन पध्दती अध्यापन प्रतीमाने आशय युक्त अध्यापन पध्दती अध्यापनाची अनेक तंत्रे शिकवीण्यात येतात याच पध्दती सोबत आपणास खालील प्राचीन अध्यापन पध्दतीच्या संदर्भात विविध तंत्रे व पध्दती विकसीत करता येतील.

१. वासनाक्षय पध्दती

२. आत्मनिरीक्षण पध्दती

३. विचार पध्दती

४. कार्यकारण पध्दत

वरील पध्दती भारतीय उपनिषदामध्ये कथन केलेल्या आहेत. हयाचा शास्त्रशुध्द विकास आपणास करता येईल. हया पध्दती मध्ये शिक्षकाला निपुण करणे आवश्यक आहे. हयातुनच ते ज्ञानाची निर्मीती करण्याची क्षमता मुलांमध्ये निर्माण करू शकतात.

**विविध कृतीसत्रे व परीसंवादाचे आयोजन :-** शिक्षक शिक्षणात आजही पारंपारीक पध्दतीचे अध्यापन होते. अध्यायनाच्या बाबतीत आपणास जास्तीत जास्त स्वयं अध्यायनावर भर द्यावा लागेल उद्देश हाच ही भारतीय विचारधारेचा चिकित्सक दृष्टीकोणातुन अभ्यास करण्याची क्षमता शिक्षकांची निर्माण व्हायला हवी. शिवाय अनुभव सिध्द शिकण्याच्या पध्दती हया शिक्षकांना शिकण्याच्या प्रक्रियेत कृतीशिल बनवतील त्यातुन त्यांना शिक्षणातील सहभाग म्हणजे काय याचे आकलन होईल सवांद पध्दतीवर आधारीत विविध कृती सत्राचे परीसंवादाचे आयोजन हे प्रक्षिणाचा दर्जा वाढवेल. सिध्दांत आणि कृती हयांचा समन्वय साधण्याची क्षमता विकसीत करण्यासाठी हयात चर्चासत्रे, कृतीसत्रे, परीसंवाद हयांचे आयोजन करणे उपयुक्त ठरेल हया व्यतीरीक्त विविध कार्यशाळा प्रकल्प हया सत्राचा अंतर्भाव आपणास करता येईल विविध शिक्षक व मुख्यध्यापकांनाही यात सहभागी करता येईल. तसेच समाजातील विविध घटकांचाही अंतर्भाव करता येईल.

**पत्राधार संच तयार करणे :-** आपल्या प्रशिक्षण काळात स्वत:चा पत्राधार संच प्रत्येक शिक्षक शिक्षणात अनिवार्य करण्यात यावा त्यामुळे स्वत:चा विकास व स्वत:मधील बदल प्रत्यक शिक्षकास पडताळता येईल हा पोर्टफोलीओ तज्ञांच्या देखरेखीत मार्गदर्शनात व साक्षीने तयार करावयास हवा. हा पोर्टफोलीओ आत्म निरीक्षणावर आधारीत व मन व्यवस्थापन करणारा ठरावा.

**मूल्यांकन :-** शिक्षक प्रशिक्षणाच्या मूल्यांकनाच्या पध्दतीत थोडा उपागमात बदल व्हावा मूल्यांकनातन पुढील गुणांचे मूल्यांकन व्हावे.

१. Original thinking

२. Indipendent judgement

यासाठी मूल्यमापनाची विविध साधने विकसीत करावी लागतील परिक्षा पध्दतीपेक्षा कृतीयुक्त मूल्यांनावर अभिव्यक्ती मूल्यांकनावर भर द्यावा व हे मूल्यांकन त्रिस्तरीय असावे हे तिन स्तर म्हणजे

१. अध्यापकांनी केलेले मूल्यांकन

२. तज्ञाच्या देखरेखेखाली स्वत: केलेले मूल्यांकन

३. सहयोगी प्रशिक्षणार्थीनी केलेले मूल्यांकन

हयासाठी मूल्यांकनाच्या साधनाची निर्मीती करता येईल अर्थात मूल्यांकन हे quantitative तसेच qualitative असावे पांरपारीक मूल्यांकनाच्या पध्दतीतीतुन शिक्षक शिक्षणाची सुटका करावी.

**सरावकाल :–** सेवाभावी शिक्षक तयार होण्याच्या दृष्टीकोनातुन प्रत्येक प्रशिक्षणार्थीची विविध शाळांतर्गत १ वर्षाची सेवाभावी सेवा अनिवार्य आहे व हया सेवेचा विस्तृत तपशिल त्याने तयार करणे अनिवार्य आहे. हया सेवा अंतर्गत पोर्टफोलीओ त्याने तयार करणे आवश्यक आहे.

**शिक्षक शिक्षणसंस्था :–** आज आपणास ज्या पध्दतीच्या शिक्षणसंस्था पाहावययास मिळतात त्यातुन एक धारणा पक्की होते की शिक्षक शिक्षण देण्या–या संस्थांचा दर्जा हा ढासळलेला आहे. शिक्षक शिक्षणसंस्था हया गुरूकुल पध्दतीवर आधारीत असाव्यात त्यातील शिक्षक हे तेवढयाच दर्जाचे अभ्यासु व पात्रताधारी असावे हया शिक्षणसंस्थांमध्ये सकाळपासुन तर संध्याकाळ रात्री पर्यंतचे वेळापत्रक निश्चीत असावे. प्रशिक्षणार्थीच्या स्वावलंबनावर यात विषेश भर असावा. त्यांना सतत उच्च व्यक्तीमत्व उच्च विचार यांचा सहवास हयावरच हया संस्थांमध्ये भर असावा. संस्थांचे मिशन व्हिजन हे राष्ट्राच्या आंतरीक उर्जेशी निगडीत असावे हया शिक्षण संस्था व तेथील वातावरण हे विस्तारीत कौटुबिंक वातावरणा प्रमाणे असावे. हयासाठी संस्थेतील मानवीय घटक हे सुसंस्कृत भारतीय विचारसरणीचे राष्ट्रभावना असणारे, धर्मप्रेमी, नितीमूल्यांच्या प्रती निष्ठा असणारे असावे.

**कालावधी :-**

शिक्षक शिक्षणाचा कालावधी हा पाच वर्षाचा असावा व त्यांनतर एक वर्षाचा छात्रसेवा काल असा एकुण सहा वर्षाचा काळ हा अनिवार्य पणे असावा. शिक्षक घडवीणे ही एका वर्षात अथावा दोन तिन वर्षात घडणारी बाब नाही. शरीराचा डॉक्टर घडवण्यासाठी आपण आयुष्यातील सात ते आठ वर्ष घालवीतो पण मनाचा शिल्पकार घडवण्यासाठी मात्र आपण कमी कालावधी देतो. ही बाब अयोग्य आहे कारण हया शिक्षक शिक्षणातुन आपणास knowledge master व wisdom master घडवायचा आहे. इयत्ता दहावी नंतर हे प्रशिक्षण देण्यात यावे प्रवेशाचा निकष हा निश्चित करावा लागेल. आधुनिक शिक्षण विषयक धोरणात शिक्षक प्रशिक्षण हे पांरगत पदवीशी निगडीत करण्याबाबत सुचीत केले आहे. पण ज्या विषयाबाबत अध्यापन कार्य शिक्षकास करावयाचे आहे त्याचा अभ्यास शिक्षक शिक्षणातच समाविष्ट करता येईल. म्हणजेच पदवी स्तरामध्ये शिक्षण शास्त्र हा विषय अंतर्भुत करण्यापेक्षा शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमात सामाजीकशास्त्रांचा, विज्ञानाचा इतर विषयांचा अतर्भाव करता येईल. शिक्षणशास्त्राचा पदव्युत्तर स्तर हा संशोधन कार्य व प्रगत अभ्यास कार्याशी निगडीत असेल व हे कार्य कृतीवर आधारीत असेल, सरावावर आधारीत असेल.

**सेवांतर्गत प्रशिक्षण :-** एकदा शिक्षकाने बी.एड. सेवांतर्गत प्रशिक्षण घेतल की तो प्रशिक्षीत शिक्षक झाला ही धारणा आता बदलायला हवी उपरोक्त दिलेल्या विविध विषयास अनुसरून परीसंवाद कृतीसत्रे, चर्चासत्रे, सराव हयाच्या माध्यमातुन शिक्षक शिक्षणाचा ओघ सुरू ठेवावयास हवा. प्रत्येक टप्प्याचा अभ्यासक्रम हा पुर्ण करणे शिक्षकाकरीता बंधनकारक ठेवयाला हवे. हया करीता विशिष्ट कालखंडाचे बंधन आखुन देण्यात यावा. वरील प्रमाणे शिक्षक प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाची केवळ निदर्शके देण्यात आली आहे. याच्या आधारावर शिक्षक प्रशिक्षणाचा विस्तृत आराखडा तयार करणे हयाची जबाबदारी स्विकारणे ही काळाची गरज आहे.